महासागर ●शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०२५

# अकोला

पान ३

## पतीने जीवे मारण्याचा प्रयत्न करून विषारी औषध चारल्याने गुन्हा दाखल

**पातूर :** पतीने १४ सप्टेंबर २०२५ रोजी दारू पिऊन पत्नी सोबत काही कारण नसताना वाद करून मारहाण करीत घरातून निघून जा अन्यथा तुझ्या मुलांना मारून टाकीन अशी धमकी देत जबरदस्तीने फिर्यादीला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माहितीनुसार फिर्यादी कोमल उज्वल शेगोकार यांच्या तक्रारीवरून आरोपी हे पती-पत्नी असून १४ सप्टेंबर रोजी आरोपी पतीने दारू पिऊन काही कारण नसताना फिर्यादी पत्नी सोबत वाद करून मारहाण केली. व तिला बोलून घरातून चालती हो घरात राहू नको ,जर राहिली तर तुझ्या मुलांना मारून टाकीन असे म्हणून आरोपी त्यांनी फिर्यादीची सासू तसेच भाचे मुलगा यांनी संगणमत करून फिर्यादीचे केस ओढून खाली पडले व जबरदस्तीने केलेला उंदीर मारण्याचे विषारी औषध चालले. तसेच फिर्यादीला जीवे मारण्याचा प्रयत्न केला फिर्यादी ही मेडिकल कॉलेज अकोला येथे उपचारासाठी असताना दिलेल्या डीडी वयानावरून आरोपी उज्वल अजाबराव शेगोकार वय ३३, वनमाला अजाबराव शेगोकार वय ४५, शुभम जाधव वय २६, राहुल जाधव वय २१ राहणार इंदिरानगर झोपडपट्टी पातुर यांचे विरुद्ध फिर्यादी सौ कोमल उज्वल शेगोकार यांच्या तक्रारीवरून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पातूर पोलिसांनी आरोपी पती उज्वल शेगोकार, व फिर्यादीची सासू यांना अटक केली आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## थोडक्यात

### विदर्भ केसरी ब्रजलाल बियाणी पुण्यतिथी निमित्त विविध कार्यक्रम



**अकोला :** जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक,सीपी बरार मध्य प्रदेश चे तत्कालीन अर्थ मंत्री, घटना समिती सदस्य, विदर्भ केसरी स्व ब्रजलाल बियाणी यांच्या ५७ व्या पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन महानगरात करण्यात आले आहे. माहेश्वरी समाज ट्रस्ट, विदर्भ चैंबर ऑफ़ कॉमर्स, जिल्हा पत्रकार संघ, अकोला जेष्ठ नागरिक संघ व राजस्थानी सेवा संघच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक २७ सप्टेंबर रोजी सकाळी ८:३० वाजता गांधी जवाहर बागेतील स्व बियाणी यांच्या पुतळ्या समोर हा आदरांजली कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आ अमोल मिटकरी हे उपस्थित राहणार आहेत. स्व. भाईजीना या कार्यक्रमात आदरांजली वाहण्याकरिता सर्व नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन माहेश्वरी समाज ट्रस्टचे प्रधानमंत्री विजयकुमार राठी,जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष शौकतअली मिरसाहेब,विदर्भ चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता,जेष्ठ नागरिक संघ अकोलाचे अध्यक्ष चंद्रकांत कुलकर्णी, राजस्थानी सेवा संघाचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल आदीनी केले.

### जामीन फेटाळला

**अकोला :** जिल्ह्यातील अकोट शहरातील १४ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याच्या प्रकरणात आरोपी मोहम्मद अयान मोहम्मद असिन वय १९, रा. अकबरी प्लॉट, अकोट. याचा अटकपूर्व जामीन अर्ज अकोट सत्र न्यायालयाने फेटाळला आहे. आरोपीने शाळेतून घरी जात असताना अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग केला होता. सरकारी वकील अजित देशमुख यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, आरोपी सतत मुलीचा पाठलाग करत होता, घटनेच्या दिवशी तिचा हात पकडून दुपट्टा ओढला आणि तिला धमकी दिली. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी हा गुन्हा गंभीर असल्याचे निरीक्षण नोंदवत आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर केला.

### मनपाव्दारा दक्षिण झोन येथे वृक्षारोपण

**अकोला :** शासनाच्या प्राप्त निर्देशानुसार मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीत स्वच्छता ही सेवा पंधरवाडा राबवण्यिात येत आहे. या अनुषंगाने आज दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी मनपा दक्षिण झोन अंतर्गत आदर्श कॉलोनी येथील मनपा शाळा क्रं. १६ च्या समोरील भागातील खुल्या जागेवर वृक्षारोपण करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम दक्षिण झोनचे सहा. आयुक्त देविदास निकाळजे यांच्या मार्गदर्शनातसंपन्नझालेअसूनयाकार्यक्रमात वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक सुनिल खेते, स्वच्छता निरीक्षक रूपेश मिश्रा, वीरेंद्र बेंडवाल यांचेसह परिसरातील नागरिकांचा समावेश होता.

### धम्म मंच व्यवस्थापन समिती सदस्यपदी रुपेश जंजाळ यांची नियुक्ती!

वाडेगावः येथील युवा कार्यकर्ते रुपेश सुभाष जंजाळ यांची धम्म मंच व्यवस्थापन समितीच्या सदस्यपदी नियुक्ती झाली. अकोला येथे बाळासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्वात धम्म चक्र परिवर्तन दिन साजरा केल्या जातो. यामध्ये विविध समित्या असतात.

## अतिक्रमण व गटार हटवून वाहतूकीस रस्ता मोकळा करा

### ■ प्रत्यक्ष पाहणीस जिल्हाधिकारी यांचे आदेश



■**अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :** येथील विजयाताई महाविद्यालय समोरच्या रस्त्यावरील गटार व अतिक्रमण हटवून वाहतूक रस्ते मोकळे करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले. गुरूवारी रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली. तहसीलदार डॉ. राहुल वानखेडे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी यांनी निर्देश दिले.विजयाताई देशमुख महाविद्यालय समोरून जाणाऱ्या बाभुळगाव राज्य मार्ग क्रमांक २८४ वर दोन महिन्यांपासून घाण पाण्याचे गटार साचले होते. विद्यार्थी, वाहन चालक, प्रवाशांना जीव घेणा त्रास सहन करावा लागला. ग्रामस्थांनी २४ रोजी घाण गटारात बसून आंदोलन छेडले. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी २५ रोजीघटनास्थळाची पाहणी केली. रस्त्यावरील गटार व वाहतूक रस्त्याची मोजणी करावी आणि अतिक्रमण हटविण्याचे निर्देश दिले.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील, उपकार्यकारी अभियंता राजेश राठोड, कनिष्ठ अभियंता हेमंत राठोड, गटविकास अधिकारी पजई, ग्रामविकास अधिकारीराजेश तायडे, मंडळ अधिकारी पियूष गंगाखेडकर, तलाठी लोखंडे, ग्राम पंचायत सरपंच गोपाल गणपतराव महल्ले आदींची उपस्थिती होती. चान्नी पोलिस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे, पीएसआय शेर अली, विजय घुगे, पोलिस कर्मचारी, महिला पोलिस कर्मचारी आणि होमगार्ड यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून साधन वितरण

■**अकोला, बु.दि २६ (प्रतिनिधी) :** जि.प. समाज कल्याण विभागामार्फत उपकर योजनेत २० टक्के विविध साधने वितरण योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत अर्ज करण्यास मुदतवाढ मिळाली असून इच्छुकांनी दि. ४ ऑक्टोबरपर्यंत पंचायत समिती कार्यालय येथे अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.मागासवर्गीय लाभार्थ्यांना एच.डि.पी.ई. पाईप पुरविणे, मागासवर्गीय लाभार्थ्यांना ताडपत्री पुरविणे, मागासवर्गीय लाभार्थ्यांना ५ एच.पी.पंप पुरविणे आदी योजनांसाठी जास्तीत जास्त मागासवर्गीय लाभार्थ्यांनी लाभ घ्यावे, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद डॉ. तुषार जाधव यांनी केले आहे.

## ऑगस्ट च्या नुकसान भरपाईपोटी ९२ कोटीची शासनाकडे मागणी

अकोला : जिल्ह्यात खरीप हंगाम मध्ये शेतकऱ्यांनी पेरलेल्या शेत जमिनी पूर्णतः जमीन दोस्त झाले आहेत जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीचा फटका शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसला आहे.

## शेतकऱ्यांनी व शेतामजूरांनी स्मार्ट मिटर काढुन जुनेच मिटर बसवण्याची मागणी

### शेतकरी संघटनेचे विदर्भ अध्यक्ष लक्ष्मीकांत कौठकर यांना केली



■**अडगाव बु.दि २६ (प्रतिनिधी) :** शेतकऱ्यांनी व शेतामजूरांनी महाराष्ट्र राज्य विज वितरक कंपनी ने बसावण्यात आलेल्या स्मार्ट मिटर काढून जुने मिटर बसवून देण्याची मागणी विदर्भ अध्यक्ष लक्ष्मीकांत कौठकर यांच्या कडे केली शेतकरी संघटनेची नुकतीच बैठक पार पडली या बैठकीत सर्व विज ग्राहकिकांनी विज बिलाबाबत अव्वाच्या सव्वा बिल गरिब मजुर यांना येत असल्या बाबत कळवले .

त्यावर शेतकरी संघटनेचे विदर्भ अध्यक्ष यांनी विज ग्राहकांना कायद्याच्या चवकटीत राहुण आपण हा लढा लढवु जर न्याय जर मिळाला नाही तर नंतर आपण आंदोलना च्पा मार्मिक मार्गाने ही न्यायाची लढाई लढु .या साठी सर्व विज ग्राहकांनी तयारी दर्शविली.यांनी घेतलेल्या चर्चा सत्रात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी कडून बसवण्यात आलेल्या स्मार्ट मीटर संबंधित चर्चासत्र मध्ये या नवीन मीटर बाबत शेतकऱ्यांनी व शेतमजुर नि तीव्र नाराजी वक्त केली.या बैठकीत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी ने स्मार्ट मीटर परत घेऊन जुनी मीटर बसवून देण्यात यावे अशी मागणी गावकऱ्यांनी लक्ष्मीकांत कौठकर यांच्या कडे केली.

यावर गरज भासल्यास आंदोलन करू असे मत लक्ष्मीकांत कौठकर यांनी वक्त केले.तर आंदोलनात काय काय होण्याची शक्यता असते.या संबंधाने सर्वांना कल्पना दिली.त्या करिता प्रत्येकाने आपली तयारी करून ठेवावी.असा आदेश सर्वांना देण्यात आला.

## अकोटातील मुरुम माफियांवर महसूल विभागाची धडक, चार वाहनं जप्त





■**अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :** सातपुड्याच्या पायथ्याशी डेरा जमवून अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्या मुरुम माफियांना महसूल विभागाच्या पथकाने जोरदार धडक दिली आहे. उपविभागीय अधिकारी व तहसीलदार अकोट यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी गणेश भारती, ग्राम महसूल अधिकारी गोपाल वानरे व रितेश मेंढे यांनी २५ सप्टेंबर रोजी दुपारी मोहाळा-पोपटखेड मार्गावर अचानक कारवाई केली. गाजीपूर गौण खनिज चेकपोस्टवर तपासणीदरम्यान एकामागोमाग चार डंपर जप्त करण्यात आले.

या वाहनांमध्ये वाहतूक परवान्यापेक्षा जास्त मुरुम भरलेले असल्याचे उघड झाले. पासपेक्षा अधिक मुरुम भरून शासनाची सरळसरळ फसवणूक होत असल्याचे चित्र उघड पडले. महसूल विभागाने सदर डंपर थेट तहसील कार्यालयात जमा करून दंडात्मक कारवाई सुरू केली आहे.मात्र, नागरिकांचा रोष वाढला असून अवैध मुरुम माफियांना केवळ दंडात्मक कारवाई नव्हे तर थेट चोरी व शासन फसवणुकीचे गुन्हे दाखल केले पाहिजेत अशी जोरदार मागणी होत आहे. सातपुड्याच्या पायथ्याशी बिनधास्त सुरू असलेली ही लूट आता थांबवावी, अन्यथा प्रशासनाची दणकट कारवाईच या माफियांचा माज मोडू शकेल, असे सुज्ञ नागरिकांचे मत आहे.

## अकोल्यात कुंकुमार्चन विधी भक्तिभावात संपन्न

■**अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :** श्री रामनवमी शोभायात्रा समिती व श्री जानकी वल्लभों मातृशक्ती सत्संग मंडळ अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कुंकुमार्चन विधी हा भक्तिमय उपक्रम राज राजेश्वर मंदिर, जुने शहर येथे मोठ्या श्रद्धा व उत्साहात संपन्न झाला. गेल्या सहा वर्षांपासून जागर आदिशक्तीचा या संकल्पनेतून शहरातील विविध भागांत होणाऱ्या या उपक्रमात यावर्षीही महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग दिसून आला. दुपारनंतर मंदिर परिसरात महिला भक्तांनी लाल रंगाच्या साड्या व पारंपरिक मंगलवेश परिधान करून एकत्र जमून कुंकुमार्चन केले. स्त्रियांनी सामूहिकरित्या केलेल्या या विधी मुळे परिसरात अद्वितीय असा आध्यात्मिक व भक्तिमय माहोल अनुभवास आला.

कुंकुमार्चनानंतर सामूहिक आरतीचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक महिलांनी अगदी भक्ती भावाने देवीसमोर आरती सादर केली. देवीच्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले. श्रद्धाळूंच्या डोळ्यांत भक्तिभावाची ओल दिसत होती.रामनवमी शोभायात्रा समिती व मातृशक्ती मंडळ यांच्या



पुढाकारामुळे गेल्या काही वर्षांपासून शहरात हा उपक्रम एक संस्कारमूल्य जपणारा सणासुदीचा भाग ठरला आहे. यामुळे महिला शक्ती एकत्र येऊन सामाजिक ऐक्य, धार्मिकता व संस्कृतीचे दर्शन घडते. गुरुकुलमब व समितीच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी व्हावा यासाठी विशेष परिश्रम घेतले.या सोहळ्याला शहरातील अनेक महिला, भाविक व नागरिकांनी उपस्थित राहून देवीच्या चरणी प्रार्थना केल्या. उपस्थित महिलांनी अशा प्रकारचे धार्मिक उपक्रम सातत्याने व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

## तणनाशक कंपनीकडून शेतकऱ्याची फसवणूक

### भाजप तालुका उपाध्यक्ष गजानन गायकवाड यांची तक्रार

■**अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :** भाजपचे तेल्हारा तालुका उपाध्यक्ष व तेल्हारा येथील शेतकरी गजानन गायकवाड यांनी निश्चिनो कंपनीचे नऊ हजार रुपये किमतीचे स्टीग्मा बुस्ट व स्टीग्मा स्प्रेड स्टिकर आणि ऍक्टिवेटर शिपू याची जमिनीत भरपूर ओलावा असतांना ३० जुन रोजी सोयाबीनच्या शेतात फवारणी केली. तणनाशकाचे प्रमाण सुद्धा कंपनीने सांगितले तेवढेच घेतले. फवारणी करून आठ दहा दिवसानंतर सुद्धा त्यांच्या शेतातील तण जळाले नाही वा त्यावर काहीच परिणाम दिसून आला नाही. याबाबत गजानन गायकवाड यांनी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांना शेताची पहाणी करण्यासाठी बोलावले असता त्यांनी उडवा उडविची उत्तरे दिली.व पुन्हा फवारणी करावी लागेल असे उत्तर दिले. गायकवाड यांचा अगोदरच फवारणी औषधीचे नऊ हजार व फवारणीचे तीन हजार असा एकूण बारा हजार रुपये खर्च झाला आहे. अगोदरच शेतीचा खर्च वाढल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. त्यामध्ये ह्या कंपन्या शेतकऱ्यांची फसवणूक करतात. तरी संबंधित कंपनीवर कठोर कारवाई व्हावी आणि इतर शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून गजानन गायकवाड यांनी कृषी विस्तारक अधिकारी पंचायत समिती तेल्हारा यांच्याकडे बिलासह लेखी तक्रार केली आहे.

## राष्ट्रविकासासाठी युवा पिढीने पुढाकार घेणे गरजेचे

### अजय निलदावार यांचे प्रतिपादन

■**अकोट,दि २६ (प्रतिनिधी) :** स्थानिक अकोट येथील राष्ट्रीय एकात्मता नवदुर्गा नवरात्र उत्सव मंडळ व छत्रपती शिवाजी महाराजस्मारकसमितीयांच्यावतीनेआयोजितनवरात्र महोत्सव व्याख्यानमालेचे द्वितीय पुष्प अजयजी नीलदावार यांनी गुंफले. देश हा सर्वोतोपरी असला पाहिजे. त्यासाठी हिंदुत्वाची ताकद जर वाढवायची असेल हिंदू धर्माला जगाच्या पटलावर नेत्रीपदक करायचा आहे तर त्यासाठी राष्ट्रधर्माचे पालन करावे लागेल.देशावर प्रेम करणारी युवा पिढी निर्माण होणे गरजेचे आहे आणि सकस हिंदुत्ववादी निर्माण होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर विहिपचे धर्मप्रसार प्रमुख प्रा.अजय निलदावार नागपूर , डॉ.अनिल शर्मा नागपूर, विहिंपचे विदर्भ प्रांत धर्मप्रसार प्रमुख



राजकुमार शर्मा, सेवानिवृत्त डेप्युटी इंजिनिअर वनवासी कल्याण आश्रम अरविंद पेशकर, पुरुषोत्तम रदे व गजानन दैनिवाल मंचावर उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन व आभार श्री श्रीकांत तळोकार यांनी तर प्रास्ताविक जय चौखंडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नवदुर्गा नवरात्र उत्सव मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

## थकित पाणीपट्टी कराचा भरणा न केल्याने पुर्व झोन येथील नळ जोडणी खंडीत

■**अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :** अकोला महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये शहरातील नागरिकांना पाणी पट्टी कराचा भरणा करणे तसेच पाणी पट्टी देयका संदर्भातील काही तक्रार असल्यास त्याचे निराकरणार्थ शहरातील विविध भागात शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच या नंतरही नागरिकांच्या मागणीनुसार सदर शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे, याचसोबत नागरिकांना पाणी पट्टी कराचा भरणा करण्याचे कार्य अधिक सोईचे व्हावे याकरिता ऑनलाईन कर भरण्याची (htts://amcwaterbill.org) या संकेत स्थळाव्दारे देण्यात आली आहे.तरी शहरातील थकित पाणी पट्टी कर धारकांनी आपले थकित व चालू वर्षातील पाणी पट्टी कराचा भरणा करून नळ जोडणी खंडीत करण्या सारख्या अप्रीय कार्यवाही टाळून मनपा प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मनपा पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे.

पुर्व झोन अंतर्गत बिर्ला बी स्थित अनामिका अपार्टमेंट येथील ३ फ्लॅट धारकांकडे बिना मीटर अर्धा इंची नळ जोडणी होती, त्यांचेकडे सन २०१७-१८ एकुण रक्कम रू. ९१,८००/- एवढा थकित पाणी पट्टी कर असल्यामुळे आज दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी थकित पाणीपट्टी कराचा भरणा न केल्यामुळे त्यांची नळ जोडणी खंडीत करण्यात आली आहे. या कारवाईत उप अभियंता संदीप चिमनकर, कनिष्ठ अभियंता निवृत्ती दातकर, विभागीय फिटर प्रवीण वरूळकर, मीटर रीडर सुबोध वानखडे, झोन कंत्राटदार पुरूषोत्तम गुंडवाल आदींची उपस्थिती होती.

## क्रांतीसूर्य कार्यगौरव पुरस्काराने डॉ. माधव देशमुख सन्मानित

**अकोला :** शिर्डी येथील साई सिल्वर ओक लॉन्स मध्ये सूर्य क्रांती शेती शिक्षण विकास संस्था महाराष्ट्र राज्याच्या वतिने सूर्यक्रांती कार्य गौरव पुरस्कार वितरण सोहळा झाला. राज्यातील ४१ विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले.त्यात अकोला येथील डॉ. माधव देशमुख होते.खासदार भाऊसाहेब वाकचौरे अध्यक्षस्थानी होते. मंचावर दिपकदादा पाटील राष्ट्रीय उपस्थित होते.

## आरोग्य शिबिरात ४० लाभार्थीची तपासणी

■**तेल्हारा,दि २६ (प्रतिनिधी) :** तालुक्यातील ग्राम उकळी बाजार येथील शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्रात बुधवार दि. २४सप्टेंबर २०२५ रोजी 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानांतर्गत पार पडलेल्या आरोग्य शिबिरात ४० लाभार्थ्यांनी नोंदणी केली होती, त्यापैकी तपासणी करण्यात आली. सदर आरोग्य शिबिरात आरोग्य उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. गरोदर माता १३, किशोरवयीन मुली ३, एचबी तपासणी ४०, टीबी स्क्रीनिंग ४० ३८ लाभार्थ्यांची एनसीडी याशिवाय पोषण.



व्यसनमुक्ती, मासिक पाळी, स्वच्छता, मानसिक आरोग्य इत्यादी विषयावर डॉ. कोमल अग्रवाल यांनी मार्गदर्शन केले. डिजिटल आरोग्य सेवा उपक्रमांतर्गत ए डी बी एम अंतर्गत १८ आधार कार्ड तयार करण्यात आले.५३ एच आय व्ही तपासणी करण्यात आली. आरोग्य शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ कोमल अग्रवाल, श्रीमती नीता टाले, आशाताई, वासुदेव म्हैसने इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले.

# महासागर

•शनिवार,दि.२७ सप्टेंबर २०२५

# अकोला

पान ६


## नवरात्र दहा दिवसांच्या उपवासात वाईट गुणांना सोडून सदविचारी बना : ह.भ प.नम्रता पाटील खुमकर

### बेलखेड येथील विशाल पहिल्या किर्तन सेवेतून उद्बोधन

**▪तेल्हारा,दि २६ (प्रतिनिधी) :**

श्री छत्रपती शिवाजी महाराज नवदुर्गा उत्सव मंडळ बेलखेड यांचे वतीने श्री शिवाजी महाराज चौक दरबार मळी येथे दि. २५ सप्टेंबर ला संध्याकाळी ८ वाजता बेलखेड कन्या ह. भ. प. नम्रता ताई खुमकर यांचे पहिले हरिकीर्तन सेवा विशाल अशा जनसमुदाय समोर संपन्न झाली यावेळी त्यांनी उपस्थित जनसमुदायाला दहा दिवसांच्या उपवास करताना किमान दहा वाईट विचारांना सोडून संसाराची घडी बसवा असे उदबोधन केले. श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक दरबार मळी बेलखेड येथे आयोजित विशाल जनसमुदायाला उदबोधन करताना त्या बोलत होत्या. किर्तन सेवा दरम्यान विदर्भ गाण कोकिळा ख्याती प्राप्त गजानन महाराज खोंड व अकोली, बेलखेड येथील टाळकरी



मृदुंगवाधारी यांनी संगीत साथ दिली. श्री कल्याण स्वामी संस्थान, अन्नपूर्णा माता मुलींची वारकरी शिक्षण संस्था, चंकलंबा जिल्हा बिड येथील गुरुवर्य साध्वी सोनाली दीदी करपे यांची शिष्या बेलखेड ची कन्या ह. भ. प. कु. नम्रताताई नरेंद्र पाटील खुम कर यांनी आपल्या पहिल्या किर्तन सेवेतून गावगाड्यातील चुलीवर भाकर करणाऱ्या माय माऊलीच मन,शेतात राबणाऱ्या कष्टकऱ्यांच्या घामाच मन,ओट्यावरील युवकांच समाज मन पहिल्याच किर्तन सेवेतून जिंकले. किर्तन सेवेतून दिलेले दृष्टांत समाज मनाचा ठाव घेणारे होती. विटेवरी उभा पांडुरंग भक्तांच्या दरबारी प्रत्यक्षात विठ्ठल उभा करून संत तुकारामांच्या अभंगांचे दाखले, नामदेव जनाबाईची निष्ठा,श्रावण बाळाचे मातापित्यांच्या ठायी सेवा, ज्ञानेश्वर महाराजांच्या ओवी, जंगदबेचा जागर नवरात्रीचा उदोउदो त्यांनी किर्तन सेवेतून केला. श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा दरबार जागवून श्रोत्यांचे मन जिंकली. किर्तन सेवा दरम्यान मंडळाचे पदाधिकारी व गावातील प्रतिष्ठीत नागरिक यांनी बेलखेड ची कन्या -विदर्भ कन्या होईल अशा भरभरून शुभेच्छा दिल्या.



मोठा महादेव सस्थान पेठपुरा



जय शिवाजी नवदुर्गा चडींका चौक हिवरखेड

## विदर्भ शेतकरी संतप्त! भरपाई न मिळाली तर आंदोलन ज्वालामुखी

### हमीदर, वीज, पीकविमा व धानाचे चुकारे तातडीने द्या; शेतकरी रस्त्यावर उतरतील




**▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :**

विदर्भातील शेतकरी आता हतबल नाहीत, तर संतप्त आहेत. ओला दुष्काळ आणि सततच्या अतिवृष्टीमुळे उन्हाळी व खरीप पिकांचे संपूर्ण मातीमोल नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी आपला आवाज ऐकवण्यासाठी शेकडोंच्या संख्येने एकत्र येऊन आंदोलनाची तयारी सुरु केली आहे.भारतीय किसान संघाच्या विदर्भ प्रांताच्या बैठकीत तालुक्यातील सर्व मंडळातील तरुण ते ज्येष्ठ शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांनी आपली तक्रार उपविभागीय अधिकारी संदीप कुमार आणि तहसीलदार रवींद्र राऊत यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुपूर्द केली.संघटनेने ठळकपणे सांगितले की – ओला दुष्काळ जाहीर करून दिवाळीपूर्वी सरसकट भरपाई द्या, कापूस–सोयाबीन–धान–मका यांची हमीभावाने खरेदी करा, बोनस त्वरित द्या, थकीत पीकविमा भरा, उन्हाळी धानाचे चुकारे द्या आणि दिवसा दहा तास वीजपुरवठा सुनिश्चित करा. अन्यथा विदर्भातील शेतकरी रस्त्यावर उतरतील आणि आंदोलनाचा ज्वालामुखी फुटेल!राहुल पुरुषोत्तमदास राठी यांनी स्पष्ट इशारा दिला की, ङ्गशेतकऱ्यांच्या हक्काशी खेळ केला



तर विदर्भात शांतता राहणार नाही. शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात; अन्यथा आंदोलन उग्र होईल.बैठकीत उपस्थित शेतकऱ्यांनी आपली निष्ठा आणि एकजूट दाखवली. तरुण शेतकरी आपला जोश घेऊन, तर प्रौढ शेतकरी अनुभव घेऊन आंदोलनाच्या तयारीत आहेत. भारतीय किसान संघाने स्पष्ट केले की, विदर्भातील शेतकऱ्यांचा हा ऐतिहासिक आवाज तातडीने परिणामकारक तोडगा मिळवण्यासाठी आहे.; अन्यथा विदर्भाचे रस्ते शेतकऱ्यांच्या आक्रोशाने पेटतील, आणि हा आक्रोश संपूर्ण राज्यभर गाजेल.

## कसांडी या शॉर्ट फिल्मचे शूटिंग चा शुभारंभ



**▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :**

कसांडी या ग्रामीण व शहरी जीवनावर आधारित लघु चित्रपटाच्या शूटिंगचा प्रारंभ चांदूर या भागामध्ये करण्यात आला एका शेतकऱ्याच्या वडिलांची कथा असलेला हा लघुपट अनिल मालगे प्रोडक्शन व या सिनेमाचे निर्माते म्हणून सेवानिवृत्त सहायक पोलीस उपनिरीक्षक प्रकाश झिंगाची तायडे व दिग्दर्शक म्हणून सचिन गिरी हे काम पाहत आहेत

या सिनेमाचे शूटिंग अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये सुरू असून यामध्ये स्थानिक कलावंतांना संधी देण्यात आल्याचे चित्रपटाचे निर्माते प्रकाश तायडे यांनी सांगितले हा सिनेमा अनिल मालगे प्रोडक्शन च्या बॅनरखाली तयार करण्यात येत असून यावेळी सिनेमाच्या शूटिंगचा प्रारंभ चांदूर भागामध्ये अकोला जिल्हा कुस्तीगीर संघाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र गोतमारे यांच्या हस्ते गणेश मूर्तीची पूजन करून हार अर्पण करण्यात आला यावेळी श्री जरांगे, शिवा झापर्डे यांच्यासह परिसरातील नागरिक यावेळी उपस्थित होते. आलेल्या सर्व पाहुण्यांचे व सर्व कलाकारांचे स्वागत प्रकाश तायडे ,सचिन गिरी ,यांनी केलेअनिल मालगे यांच्या संपूर्ण नियोजनामध्ये हा सिनेमा तयार होत असून लवकरच हा सिनेमा तयार होईल असे निर्माता प्रकाश झिंगाची तायडे यांनी सांगितले.

## सोयाबीन चोरीतील आरोपीला अटक



**▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :**

अकोला : शहरातील एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीतील वखार महामंडळाच्या गोदाम मधून सोयाबीनचे कट्टे लंपास केल्याची घटना घडली होती. या प्रकरणी पोलिसानी दोन आरोपींना अटक केली आहे. एमआयडीसी रिसरातील वखार महामंडळाच्या गोदामचे शटर वाकवून चोरट्यांनी ४९ कट्टे सोयाबीन लंपास केल्याची घटना २ ऑगस्ट रोजी घडली होती. या प्रकरणी पोलिसानी दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्या जवळूनएक लाख एकतीस हजार रुपये किमतीचे सोयाबीन जप्त केले आहे. या प्रकरणी पोलिसांनी शेख फैजान शेख जामीन राहणार फिरदोस कॉलनी व इम्रान खान अयाज खान राहणार नया बैदपुरा अकोला यांना अटक केली आहे, अटक केलेल्या आरोपींना आज न्यायालय समोर हरज करण्यात येणार असून ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार राहुल जंजाळ यांनी व कर्मचाऱ्यांनी केली.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा




**▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :**

राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या अकोला जिल्हा शाखेने विविध उपक्रमांचे आयोजन करून आपला वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.

माजी समाज कल्याण मंत्री आणि महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनराव घोलप (नानासाहेब), यांनी १९९५ मध्ये या संघटनेची स्थापना केली होती. सुरुवातीला 'महाराष्ट्रीय चर्मकार महासंघ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या संस्थेचे आज 'राष्ट्रीय चर्मकार महासंघ' या मोठ्या संघटनेत रूपांतर झाले आहे. राज्याचे निरीक्षक गजानन भटकर, युवा प्रदेश अध्यक्ष रामा उंबरकर, आणि विदर्भ अध्यक्ष संभाजी वाघमारे यांच्या सूचनेनुसार आणि अकोला जिल्हाध्यक्ष प्रवीण चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी समाजाच्या हितासाठी विविध उपक्रम राबवण्यात आले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अकोला जिल्हाध्यक्ष प्रवीण चोपडे, सुनील झेड. गवई, महानगर अध्यक्ष शिवलाल इंगळे, महानगर युवा अध्यक्ष अमोल वानखडे आदि उपस्थित होते.

## प्रभातचे ६ खेळाडू स्क्वॅश स्पर्धेत विभागस्तरावर




**▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :**

प्रभात किड्स स्कूलच्या सहा खेळाडूंनी जिल्हास्तरीय स्क्वॅश स्पर्धेत उत्कृष्ट यश प्राप्त केल्याने त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय स्क्वॅश स्पर्धे चे आयोजन नोवेल स्कूल, अकोला येथे दि. १२ सप्टेंबर २०२५ दरम्यान करण्यात आले होते.या स्पर्धेत १४ वर्षाआतील मुलांमध्ये सर्वज्ञ पाटील ह्याने पाचवा क्रमांक प्राप्त केला तर मुलींमध्ये महिमा ओळंबे हिला दुसरा क्रमांक व संस्कृती तिरकर हिने चवथा क्रमांक मिळवीला. तसेच १७ वर्षाआतील मुलांमध्ये तनीष्क कोरडे ह्याने दुसरा क्रमांक तर आयुष टकरानी ह्याने चवथा क्रमांक प्राप्त केला. मुलींमध्ये आर्या राठी हिने पाचवा क्रमांक प्राप्त करून घवघवीत यश मिळवून या सर्व विद्यार्थ्यांनी विभागीय स्पर्धेकरीता निवड झाली आहे.

## दगडपारवा येथे विमुक्त जाती संवर्गातील लाभार्थ्यांना ओळखपत्रे, प्रमाणपत्रे व विविध योजनांचा लाभ

**▪बार्शिटाकळी,दि २६ (प्रतिनिधी) :**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी यांचे जन्मदिन दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दिनांक २ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीमध्ये आयोजित ङ्गसेवा पंधरवाडाङ्ग राबविण्यात येत आहे.

सदर सेवा पंधरवाडामध्ये बार्शीटाकळी तालुक्यातील मौजे दगडपारवा येथे आज दि.२५ सप्टेंबर २०२५ रोजी विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील लाभार्थ्यांना ओळखपत्रे प्रमाणपत्रे व विविध योजनांचा लाभ देण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिराचे अध्यक्ष



स्थानी सरपंच ग्रामपंचायत दगडपारवा ज्योतीताई हिम्मत पवार तर प्रमुख पाहुणे म्हणून राजेश वझीरे तहसिलदार बार्शीटाकळी, उपसरपंच ज्ञानेश्वर जामनिक हे होते. या शिबिरामध्ये विमुक्त व भटक्या जातीतील लाभार्थ्यांना उत्पन्नाचे दाखले अधिवास प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, आधार कार्ड, राशन कार्ड, विवाह नोंदणी प्रमाणपत्र ,जन्ममृत्यू नोंदणी प्रमाणपत्र व इतर आवश्यक अशा १५९ प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. सदर शिबिराचे प्रसंगी तहसिलदार राजेश वझीरे यांनी शासनाच्या विविध योजना संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, अंतोदय अन्न प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजना, ॲग्री स्टॅग, ई-पीक पाहणी, पांदन रस्ते व सेवा पंधरवाडा इत्यादी योजना विषयी माहिती देऊन त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन नागरिकांना केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळ अधिकारी वसंत पारस्कर, सूत्रसंचालन प्रितेश गवई सेतु संचालक व आभार प्रदर्शन ग्रामपंचायत अधिकारी नारायण दिवनाले यांनी केले.

सदर शिबिरास ग्राम महसूल अधिकारी रचना धनाडे ,पुरवठा विभागाचे कैलास शेगोकार, आधार संचालक सुधीर डिडोळकर, सेतू संचालक प्रितेश गवई, सुरज चव्हाण, पवन जाधव, ग्रामपंचायत कर्मचारी जितेंद्र खंडारे, ग्रामपंचायत सदस्य व बहुसंख्य लाभार्थी नागरिक हजर होते.


**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Passport :- **(K6323790)**
-------From----------
**SAMIRA JALIS KHAN**
---------TO------------
**SAMEERA KHAN JALIS KHAN**
My Residential Address is :- C/O Jalis ahmad khan ibrahim khan, Khidki pura , old city, Akola 444002.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Passport :- **(E3833370)**
-------From----------
**TAFAJJUL ULLAH KHAN NAZIR MOHAMMED KHAN**
---------TO------------
**TAFAZZULULLA KHAN NAZEER MOHAMMAD KHAN**
My Residential Address is :- Indira Nagar Ashok Nagar Akot Fail Ramabai Ambedkar Wadi Akola 444003.


## मराठा महासंघाचे वतीने कै. आ. अण्णासाहेब पाटील यांची जयंती

**▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :**

अखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हा शाखा अकोला चे वतीने दिनांक २५ सप्टेंबर रोजी मराठा महासंघाच्या जिल्हा कार्यालयात अखिल भारतीय मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष कै. आम दार अण्णासाहेब पाटील यांचे जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सुरुवातीला यांचे प्रतिमेचे पूजन देवराव पाटील, राम मुळे ,सुरेश ठाकरे ,सतीश सुर्वे यांचे हस्ते करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. ह्या प्रसंगीत अमर रहे !अमर रहे! अण्णासाहेब पाटील ,अमर रहे !अशा घोषणा देण्यात आल्या. मराठा महासंघाचे माजी केंद्रीय पदाधिकारी श्री देवराव पाटील यांनी कै. अण्णासाहेब पाटील यांनी मराठा महासंघाचे अध्यक्ष पद स्वीकारल्या नंतर संपूर्ण महाराष्ट्र पिंजून



काढला व समाज जागृती करून समाज एकसंघ केला व आर्थिक निकषावर सवलती द्या ,शेतमालाला भाव द्या, युवकांना रोजगार द्या या व अशा अनेक प्रमुख मागण्यांसाठी जवळपास तीन लाख लोकांचा मोर्चा मुंबई येथे मंत्रालयावर नेला परंतु मागण्या मंजूर न झाल्यामुळे त्यांनी समाजाच्या मूलभूत प्रश्नासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली. कै. अण्णासाहेब पाटील यांचे अपूर्ण कार्य पूर्ण करण्यासाठी सर्वांनी झटावे असे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले. मराठा महासंघाचे विदर्भ प्रदेश उपाध्यक्ष श्री राम मुळे यांनी कै. अण्णासाहेब पाटील यांनी केलेल्या कार्याची महती विशद करताना अण्णा साहेबांनी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात दौरे करून मराठा समाज एक संघ केला व मजबूत अशी वज्रमुठ बांधली. त्यांनी माथाडी कामगारांच्या मुलांसाठी शाळांची निर्मिती केली तसेच त्यांचे कुटुंब ऊर्जावस्थेत यावीत यासाठी त्यांना घरे मिळवून दिली. मराठा समाजाचे आशास्थान तर आर्थिक दुर्बलांचे स्फूर्ती स्थान कै. अण्णासाहेब पाटील होते. समाजासाठी आमदारकीचा राजीनामा देणारे ते एकमेव नेते होते. युवकांनी त्यांचे कार्याचा आदर्श घ्यावा असे प्रतिपादन राम मुळे यांनी या प्रसंगी केले.

## भ्रष्टाचार निर्मूलन समिती ची महानगरपालिकाच्या दालनात सर्व खाते प्रमुखका सोबत बैठक

**▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :**

शहरात मुख्य रस्त्यावर उभे राहणारे फिरणारे मोकाट जनावरे यांचा बंदोबस्त त्वरित करणार तसेच शहरात भटके कुत्र्यांचा खूप त्रास होतो नागरिकांना व शाळेत मुले जाताना आणि येताना कुत्रे जावा घेतात तसेच अपघात सुद्धा घडतात सदर कुत्र्याचा लवकरात लवकर बंदोबस्त करणार असे आश्वासन दिले नवीन बस स्थानकाजवळील भुयारी मार्ग लवकरात लवकर वाहतुकीसाठी जाणे येण्यासाठी मोकळा करणार तसेच शहरातील व वार्डातील रस्ते चांगल्या दर्जाचे करणार याकडे आम्ही पूर्णपणे लक्ष देऊ तसेच शहरातील कचरा व घाण होणार नाही याकडे आम्ही जातीने लक्ष घालू असे आश्वासन देण्यात आले भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सर्व मुद्दे निकाली काढून समितीला लेखी स्वरूपात देणार सदर बैठकीमध्ये भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते जिल्हाध्यक्ष एम के दिवनाले , ॲड प्रणव मार्के, महीला जिल्हाध्यक्ष ॲड कांचन शिंदे , ॲड चंद्रकांत वानखडे, ॲड दिपाली जानोरकर, ॲड श्रुती भट, ॲड अभिषेक गौतम, ॲड ओम मते, ॲड संजय देशमुख ॲड चैताली बुंदेले ॲड प्रज्ञा चक्रनारायण, ॲड वर्षा सदार आदि उपस्थित होते.


RNINO-46973/1986 **महासागर अकोला** मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

